


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २५२ वा | सोमवार दि ०८ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# टेकाळेंच्या खुल्या चौकशीसाठी तारांकित करण्यासाठी महसूल मंत्री यांना साकडे...

## दैनिक जनसंचलनचा भ्रष्टाचारावर आणखी एक प्रहार...

## तारे यांची डोंगर खंडाळा १४ एक्कर जमीन प्रकरणात मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांचा पुन्हा २०२५ चा नियमबाह्य दिलेल्या पत्रांवर बाजार मूल्य कोटी रुपयांचे झाले व्यवहार ?



**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी गेल्या अनेक वर्षांच्या आपल्या महसूल विभागातील सेवेच्या काळात अत्यंत बेशरमपणे केलेल्या बेबंद भ्रष्टाचारातून प्रचंड अशी अवैध चल - अचल संपत्ती गोळा केली आहे. ही संपत्ती त्यांनी स्वतःसह पत्नी, भाऊ आणि इतर नातेवाईकांच्या नावावर केलेली आहे. त्यांच्या या संपूर्ण बेकायदेशीर संपत्तीची कित्येक दिवसापासून खुली चौकशी सुरू असून अद्याप पर्यंत कोणतीच कायदेशीर कारवाई नाही,यासाठी दैनिक जनसंचलनने आता पुढाकार घेतला असून यासंदर्भात महाराष्ट्र राज्याचे अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले महसूल मंत्री बावनकुळे यांना यासंदर्भात पत्र दिले आहे.या पत्रामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक यांच्याकडे करण्यात आलेल्या तक्रार अर्ज तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस उपअधीक्षकांशी केलेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देण्यात आला आहे.महसूल विभागाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड म्हणजे मंडळ अधिकारी विजय टेकाळे हे आहेत. विजय दत्तात्रय टेकाळे यांनी आपल्या २५-३० वर्षांच्या महसूल विभागातील सेवेत अत्यंत घाणेरडे असे गैरप्रकार आणि गैरव्यवहार केलेले आहेत.महसूल विभागात राहून त्यांनी एकीकडे शासनाच्याच महसूलाला चुना लावलेला आहे. दुसरीकडे अनेक नागरिकांच्या संपत्तींमध्ये हेरफेर करून आपल्या तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे. अनेक केसेसमध्ये संपत्तीच्या वारसा हक्काच्या कागदपत्रांमध्ये त्यांनी हेरफेर केलेला आहे.जमीन महसूल अधिनियमात प्रचंड टेकाळेंनी गैरप्रकार केलेले आहेत. खरे तर टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराची गाथा लिहायची झाल्यास १०० कागद देखील कमी पडतील,अशी स्थिती आहे.सर्वांत आश्चर्यकारक बाब म्हणजे आज महसूल प्रशासनातील जिल्हाधिकाऱ्यांपासून ते अपर जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत आणि उपजिल्हाधिकाऱ्यांपासून ते उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत सर्वच अधिकारी हे टेकाळे यांच्यासमोर अत्यंत लाचार झालेले आहेत. टेकाळे यांनी अख्खे महसूल प्रशासन आपल्या दावणीला बांधून घेतली,अशी स्थिती आहे.कारण अत्यंत बेशरमपणाने आणि कोडगेपणाने टेकाळे यांनी जो काही भ्रष्टाचार केलेला आहे तो महसूल विभागाच्या सगळ्या अधिकाऱ्यांना माहिती आहे.परंतु तरीही टेकाळेंवर कारवाई होत नाही,याचा अर्थ स्पष्ट आहे की,महसूल विभागातील अनेक अधिकारी हे टेकाळेंच्या भ्रष्टाचारात सामील आहेत.त्यामुळे टेकाळे यांना अक्षरशः ब्लॅकमेल करतात.टेकाळे हे आपल्याच अधिकाऱ्यांवर दबाव टाकून आणि प्रसंगी आपल्याच अधिकाऱ्यांच्या आदेशांना केराची टोपली दाखवून काम करतात.परंतु तरीही त्यांच्यावर कारवाई करण्याची कुणाही अधिकाऱ्याची हिम्मत होताना दिसून येत नाही. टेकाळे यांनी जो काही भ्रष्टाचार केला त्या पैशांतून त्यांनी प्रचंड अशी बेनामी चल अचल संपत्ती गोळा केली आहे.ही संपत्ती त्यांनी

**नेहमी वादग्रस्त ठरलेले बहुचर्चित मंडळ अधिकारी यांच्या विरोधात नेहमी भ्रष्टाचार प्रकरण व नियमबाह्य केलेल्या कामांची शेकडो पुराव्यासह दिलेल्या तक्रारी व महसूल व पोलीस प्रशासनाची सुरू असलेली चौकशी सुरू असून सुद्धा फडणवीस सरकार यांच्या काळात पदोन्नती होतीच कशी हा फार मोठा प्रश्न उपस्थित होत आहे**

आपल्या भावाच्या,पत्नीच्या नावावर तसेच इतर नातेवाईकांच्या नावावर देखील केलेली आहे.यासंदर्भातील सविस्तर माहिती दैनिक जनसंचलनच्या वतीने एकीकडे वृत्तमालिकेद्वारे सातत्याने प्रकाशित करण्यात येत आहे, तर दुसरीकडे सातत्याने महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी,लोकप्रतिनिधी,मंत्री यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम केले जात आहे.दैनिक जनसंचलन ने स्वतः पुढाकार घेऊन टेकाळे यांच्या बेनामी संपत्तीची अनेक कागदपत्रे मिळवली आहेत.याचे संपूर्ण पुरावे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडेही सादर केलेले आहेत. त्या पुराव्यांवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महसूल व पोलिस विभागाशी पत्रव्यवहार करून टेकाळेंवर कारवाई करण्यासंदर्भात सांगितले आहे. मात्र ना महसूल विभाग ना पोलिस प्रशासन कोणीही टेकाळेंवर कारवाई करण्यास पुढे येत नाही.टेकाळेंच्या सोबतच महसूल प्रशासनातील काही अधिकारी देखील प्रचंड मस्तवाल झालेले आहेत. दैनिक जनसंचलनच्या वतीने जेंव्हा टेकाळेंच्या संपत्तीसंदर्भात कागदपत्रांची नक्कल मागण्यात आली होती,त्या वेळी तलाठी आस्थापन विभागातील अव्वल कारकून यांनी ही कागदपत्रे देण्यास चक्क नकार दिला होता.यावरून महसूल प्रशासन किती मुजोर झाले हे दिसून येते.अखेर दैनिक जनसंचलनच्या वतीने यासंदर्भात आता महाराष्ट्र राज्याचे अभ्यासू व्यक्तिमत्व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हिवाळी अधिवेशनपूर्वी पत्र पाठवून त्यांना टेकाळे यांच्या भ्रष्टाचार प्रकरणी तसेच त्यांची अवैध चल अचल संपत्तीची चौकशी करून जप्त करण्यासंदर्भात विधानसभेत बुलडाणा जिल्हयातील लोकप्रतिनिधींना तारांकित प्रश्न उपस्थित करण्यासंदर्भात साकडे घातले आहे. राज्यात नव्याने पदारूढ झालेल्या फडणवीस सरकारने तरी टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराची विषवल्ली तात्काळ नष्ट करावी, ही अपेक्षा आहे.

...अजून बरेच काही पुढील भागात...

# तर्कबुद्धीचा उतारा...



अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा जरी नागरिकांचा मूलभूत अधिकार असला तरी, त्याचं मूल्य आणि महत्त्व नागरिकांनीच समजून घेतलं पाहिजे. ते समजून घेता उद्या त्याचा अयोग्य वापर सुरू झाला तर सरकार हस्तक्षेप करेल. सरकारचा हस्तक्षेप कोणालाच हवासा वाटत नाही, त्यामुळे लोकांनीच जबाबदारीचं भान बाळगून स्वतःच स्वतः साठी आचारसंहिता आखून घ्यावी. १४ जुलै २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न यांच्या पीठाने, वजाहत खान विरुद्ध केंद्र सरकार या प्रकरणाचा निकाल देताना हे महत्त्वपूर्ण भाष्य केलं. विषय होता अर्थातच समाज माध्यमांवर सुरू असलेली बेबंद अभिव्यक्ती. वजाहत खान यांनी ङ्गशर्मिष्ठा पनोलीफ या इन्फ्लयूअन्सरने समाज माध्यमावर इस्लामचा अपमान करणारी पोस्ट केली म्हणून गुन्हा दाखल केला होता आणि त्यानंतर शर्मिष्ठाला अटक देखील झाली. पण शर्मिष्ठाच्या अटकेनंतर, वजाहत यांच्या विरोधात, त्याने हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट केली म्हणून गुन्हे दाखल झाले. क्रिया-प्रतिक्रियांचा हा खेळ सुरू झाला आणि शेवटी वजाहत यांनी स्वतःच्या विरोधातील सर्व गुन्हे एकाच ठिकाणी सुनावणीस घ्यावे, अशी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली. त्यावेळी वजाहत यांची बाजू मांडताना त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितलं की, ङ्गवजाहतने त्याची पोस्ट काढून टाकली आहे याची दखल न्यायालयाने घ्यावी...फ त्यावेळेस न्यायाधीशांनी स्वच्छ शब्दांत सांगितलं की, ङ्गएखाद्याने बदनामीकारक पोस्ट मागे घेतली म्हणून त्याला माफ कसं करायचं? त्याने जो गुन्हा केला आहे आणि त्यामुळे जे नुकसान व्हायचं आहे ते झालं आहेच, त्याची भरपाई कशी होणार?फ समाज माध्यमं ही दुहेरी तलवार झाली आहे. माणसाच्या ज्ञात इतिहासात, त्याला जगात काय चाललंय, हे जाणून घेण्याची शक्ती आणि शक्यता कधी नव्हती इतकी आता त्याच्या आवाक्यात आली आहे आणि त्यावर व्यक्त होण्यासाठी समाज माध्यमं त्याच्या हातात आली आहेत. माहितीचा विस्फोट झाला आहे, असं आपण म्हणतोय, पण त्याच्या जोडीला अभिव्यक्तीचा देखील विस्फोट झाला आहे, हे पटकन लक्षात येत नाही. मुळात आपल्यासमोर जी माहिती येत आहे ती पूर्णपणे तथ्यांवर आधारलेली असेलच असं नाही; उलटपक्षी ती एकांगी असेल, ती कोणीतरी स्वतःच्या फायद्यासाठी वापरत असेल, हेच लक्षात घेत नाही. समाज माध्यमं असतील किंवा व्हॉट्सॲपवर जे जे येतं ते कोणी लिहिलं आहे, किंवा बनवलं आहे, त्याचे हेतू काय आहेत, हे बघायला वेळच लोकांकडे नाही. सन २०१५मध्ये दिवसाला एक तास इंटरनेटवर घालवणारा भारतीय माणूस आज दिवसाला सरासरी सहा तास मोबाइलच्या स्क्रीनला खिळून असतो. मुळातच माणसाची वृत्ती ही त्याला जे ङ्गसत्यफ वाटतं, त्याला पूरक जो कोणी बोलेल किंवा लिहील किंवा व्यक्त होईल ते खरं मानण्याची असते. याला ङ्गकन्फर्मेशन बायसफ असं म्हणलं जातं. यांत पुन्हा समाज माध्यमांचं अल्गोरिदम्स देखील प्रभाव टाकतच असतात. तुमच्या ङ्गबायसफला अधिक घट्ट करणारा कन्टेन्ट दाखवणं हे अल्गोरिदम्सच काम असतं. नेटफ्लिक्सच्या रिड हेस्टिंग्जने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, माणसाची झोप हाच नेटफ्लिक्सचा मोठा प्रतिस्पर्धी आहे, तसंच सर्व समाज माध्यमांसाठी तुम्ही त्या त्या समाज माध्यमाच्या पलीकडे दुसऱ्या कुठल्याही गोष्टीत मन रमवणं याची त्यांना भीती वाटते. त्यामुळे ते तुमच्यासमोर तुमच्या कन्फर्मेशन बायसला पूरक असा कन्टेन्ट आणून ओतत राहतात. माणसाने कितीही दावा केला तरी त्याचा नकारात्मक गोष्टींवर अधिक विश्वास बसतो आणि त्यात माणसाचं समूहमन असं असतं की, त्याला आपल्या सामाजिक मूल्यांवर, नीतिमत्तेवर कोणीतरी आघात करतंय, अशी भीती सातत्याने वाटत असते. पूर्वी असं नव्हतं... असं आपण सहज म्हणतो, पण राग, द्वेष, लोभ या माणसाच्या चिरंतन भावना आहेत आणि त्यातून त्याच्या हातून जे जे प्रमाद घडू शकतात ते देखील चिरंतन सुरू आहेत. पण आत्ताच सगळं वाईट व्हायला लागलं आहे, यावर माणसाला पटकन विश्वास बसतो. १९७२मध्ये स्टॅनली कोहेन नावाच्या समाजशास्त्रज्ञाने हे अभ्यासातून सिद्ध करून दाखवलं. यात एकच गोष्ट आहे जी पूर्वी नव्हती ती म्हणजे माध्यमांचा आणि समाज माध्यमांचा झालेला विस्फोट. पूर्वी २४ तास चालणारी माध्यमं नव्हती, त्यामुळे गोष्ट अतिरंजित करून सांगणारी कुठली व्यवस्था नव्हती, जी आता आहे; ज्यामुळे मुळात माणसांच्या वागण्याची अवस्था, आधीच मर्कट, त्यात मद्य प्यायला अशी झाली आहे.

आज भारतात जवळपास ८२ कोटी लोकं इंटरनेट वापरतात, आणि जवळपास ५० कोटी लोकं व्हॉट्सॲप वापरतात. जगाशी तुलना केली तर भारतात इंटरनेट जवळपास फुकट मिळतं, असं म्हणलं तरी ती अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यात इतक्या मोठ्या खंडप्राय देशात काही ना काही घटना घडतच असतात. त्या पूर्वी इतक्या वेगानं लोकांपर्यंत पोहोचयाच्या नाहीत. त्या आता वायुवेगाने पसरतात. त्यात व्यक्त होण्याची उबळ किंवा व्यक्त सोडा, पण मी कोणाला पुढे नाही पाठवलं तर मी जबाबदारीपासून पळ काढला, अशी मानवी भावना पुन्हा जोडीला आहेच. वजाहत खान यांच्या बाबतीत निकाल देताना न्यायालयाने, समाज माध्यमांवर व्यक्त होताना काही आचारसंहिता पाहिजे, असं म्हटलं असलं तरी हे असं काही पहिल्यांदा म्हटलेलं नाही. हेमंत मालवीय या व्यंगचित्रकाराने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची खिल्ली उडवणारं व्यंगचित्र समाज माध्यमावर प्रसिद्ध केलं होतं. त्याविरोधात पुढे समाज माध्यमांवर शब्दशः आगडोंब उसळला होता, आणि हेमंत मालवीय यांच्याविरोधात अनेक ठिकाणी गुन्हे दाखल झाले. त्यावर निवाडा देताना सर्वोच्च न्यायालयाने समाज माध्यमातून ज्या पद्धतीने द्वेष पसरत आहे त्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. इतकंच नाही तर व्यंग मांडताना सीमारेषा काय असली पाहिजे, ती कशी आणि कोण ठरवणार? हा मुद्दा देखील मांडला होता. अशाच एका प्रकरणात एका पत्रकाराला, एका महिला पत्रकाराच्या विरोधात समाज माध्यमांवर त्याने ज्या अश्लाघ्य टिपणी केल्या होत्या त्या काढायला सांगितल्या होत्या. हा निकाल देताना आपल्या अभिव्यक्तीमुळे आपण एखाद्या व्यक्तीचं आणि समाजाचं खच्चीकरण करत नाही ना, याचं भान ठेवावं, असं न्यायालयानं नमूद केलं. पण यक्षप्रश्न हाच आहे की, हे भान येणार कसं?




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महायुती सरकारचं एक वर्ष पूर्ण; 'महाराष्ट्र दिल्लीत गहाण' असल्याची काँग्रेसची टीका

**नागपूर :** महायुती सरकारला सत्तेत येऊन आज एक वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. गेल्या एका वर्षात महाराष्ट्राला विकासाऐवजी अराजकता, द्वेष, जाती-जातीतील संघर्ष, कायदा व सुव्यवस्थेचे लक्तर लटकलेले चित्र आणि सरकारी जमिनींची विक्री पाहायला मिळाली, असे घणाघाती आरोप त्यांनी केले. हे वर्ष महाराष्ट्रासाठी दुर्दैवाने लक्षात राहील, असे ते म्हणाले.सपकाळ म्हणाले की, निवडणुकीच्या वेळी दिलेल्या आश्वासनांपैकी एकही आश्वासन सरकारने पूर्ण केलेले नाही. राज्याचा स्वाभिमान दिल्लीच्या सत्तेकडे गहाण ठेवण्यात आला असून २०१४ ते २०१९ दरम्यानचे देवेंद्र फडणवीस आणि आजचे मुख्यमंत्री यांच्यात जमीन-अस्मानाचा फरक दिसतो. आता महाराष्ट्रासाठी काम करण्याची कोणतीही राजकीय इच्छाशक्ती त्यांच्याकडे उरलेली नाही. सध्या महाराष्ट्राचे खरे मुख्यमंत्री केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आहेत आणि देवेंद्र फडणवीस हे केवळ 'रबर स्टॅम्प' म्हणून काम करत आहेत, असा थेट आरोप त्यांनी केला.राज्यातील प्रशासनाला 'गलथान कारभार' म्हणून संबोधत सपकाळ यांनी अनेक उदाहरणे दिली. नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्र्याचा निर्णय सरकार एका वर्षात घेऊ शकले नाही, ही त्यांची असमर्थता असल्याचे ते म्हणाले. राज्याला 'आका', 'खोके', 'कोयता गँग', 'रेती गँग' यांसारखी गुन्हेगारी शब्दावली सरकारने बहाल केली असल्याची टीका त्यांनी केली. यामुळे राज्यात गुन्हेगारी वृत्तीला खतपाणी मिळत आहे, असेही त्यांनी नमूद केले.पुण्यातील बलात्कार प्रकरणावर गृहराज्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यावर सपकाळ यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ङ्गपीडित महिला ओरडली असती तर बलात्कार झाला नसता,ङ्ख असे अत्यंत असंवेदनशील विधान सरकारच्या गृहराज्यमंत्र्यांकडून केले जाते, हे महाराष्ट्रासाठी लज्जास्पद असल्याचे त्यांनी म्हटले.



तसेच त्यांच्या कुटुंबाशी संबंधित डान्स बार प्रकरणाचाही त्यांनी उल्लेख करत सरकारची नैतिकता प्रश्नांकित केली.

विधानसभेत चर्चेऐवजी 'रमी खेळली जाते' आणि चर्चा सुरू असताना गुंडागर्दी पाहायला मिळते, असा आरोप करत सपकाळ यांनी सरकारला 'लाचार' संबोधले. हे सरकार सत्तेसाठी एकत्र आले असून पुरोगामी विचार, महाराष्ट्र धर्म आणि राजधर्म पाळण्याची त्यांची तयारी नाही. हे अधर्मी, टोळी युद्धाचे आणि बेशरम सरकार असल्याची कठोर टीका त्यांनी केली.याच वर्षात संतोष देशमुख आणि संपदा मुंडे यांसारख्या हत्याकांडांच्या घटना घडल्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासातील हे सर्वात लाचार सरकार ठरले असल्याचे सपकाळ यांनी म्हटले. जाती-जातीतील आरक्षणाचा संघर्ष, बौद्धिक व मानसिक दिवाळखोरी वाढत असून ती सावरण्याची सरकारकडे कोणतीही योजना नाही, असा आरोप त्यांनी केला. केंद्राकडून केवळ पंतप्रधानांचे नामजप करण्याऐवजी महाराष्ट्रासाठी विशेष आर्थिक पॅकेज आणावे आणि बिघडलेली अर्थव्यवस्था सुधारावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच पुढच्या एका वर्षासाठी देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा देत मागच्या एका वर्षामध्ये त्यांची तुलना औरंगजेब क्रूर असल्यामुळे, आणि औरंगजेबाचा जसा कार्यकाळ सुरू होता तशी आपली तुलना ही औरंगजेबाचा कारकिर्दीशी करावी लागली होती. ज्या पद्धतीने थंड डोक्याने महात्मा गांधीचा खून नथुराम गोडसेने केला होता तीच मोडस ऑपरेंटिस देवेंद्र फडणवीस यांची आहे. त्यांनी असं वागू नये आणि महाराष्ट्राचे जाजवल्य अभिमान आणि सांस्कृतिक बाळगून पुढच्या वर्षीच्या कार्यकाळ त्यांच्या संपन्न व्हावी ही शुभेच्छा त्यांना देत आहेत. असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## जय पवारांचं लग्न बहरीनमध्ये, शाही सोहळ्यात फक्त ४०० पाहुणे

**पुणे :** युगेंद्र पवार यांचा जंगी विवाह सोहळा पार पडल्यानंतरही पवार कुटुंबातील लगीनघाई ओसरलेली नाही. 'शरद पवार गटा'तील नातवाच्या लग्नानंतर आता ' अजित पवार ' गटातील लेकाचा शाही विवाह सोहळा रंगणार आहे. कारण आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांचे सुपुत्र गरू झुरी थशववळपस होत आहे. विशेष म्हणजे हा सोहळा मुंबई-पुण्यात नाही, महाराष्ट्रातच काय भारतातही होत नाहीये, तर बहरीनमध्ये पार पडणार आहे. पाच डिसेंबर रोजी दोघं विवाहबंधनात अडकणार आहेत.

जय पवार आणि ऋतुजा पाटील यांचा विवाह सोहळा चार ते सात डिसेंबर २०२५ या कालावधीत बहरीनमध्ये होणार आहे. या समारंभासाठी पवार-पाटील कुटुंबीयांकडून केवळ ४०० पाहुण्यांना



निमंत्रण पाठवण्यात आले आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातूनही फक्त दोनच नेत्यांना या लग्न समारंभासाठी निमंत्रित करण्यात आलं आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा निमंत्रितांमध्ये समावेश आहे.गरू झुरी आणि ऋतुजा पाटील यांच्या लग्नानिमित्त ४ डिसेंबर रोजी मेहंदी, ५ डिसेंबर रोजी हळद, वरात आणि मुख्य लग्नसोहळा, ६ डिसेंबर रोजी संगीत, तर ७ डिसेंबर रोजी स्वागत समारंभ होणार आहे.

## एकनाथ खडसे सराईत गुन्हेगार', चंद्रकांत पाटील यांची खोचक टीका...

**जळगाव :** राज्यभरात २ डिसेंबरला नगर परिषद आणि नगर पंचायतींसाठी निवडणूक पार पडलं आहे. काही ठिकाणी तांत्रिक आणि न्यायालयीन कारणास्तव येत्या २० डिसेंबरला मतदान पार पडणार आहे. त्यानंतर २१ डिसेंबरला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. दरम्यान, २ डिसेंबरला पार पडलेल्या मतदानाच्या दिवशी अनेक ठिकाणी वाद झाल्याचं बघायला मिळालं. जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर शहर तर प्रचंड चर्चेत राहीलं. या ठिकाणी मतदानाच्या दिवशी शिवसेना आणि भाजपचे कार्यकर्ते आमनेसामने आले. मतदान केंद्रावर मोठा राडा देखील झालेला बघायला मिळाला.विशेष म्हणजे शिवसेनेचे आमदार चंद्रकांत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांच्यातील





वाद प्रचंड टोकाला पोहोचताना दिसत आहेत. तसेच भाजपच्या केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आणि शिवसेनेचे चंद्रकांत पाटील यांच्यातही वाकयुद्ध रंगलेलं आहे. असं असताना चंद्रकांत पाटील यांनी मतदानानंतर एकनाथ खडसेंवर अतिशय खोचक शब्दांत टीका केली आहे. त्यांनी खडसेंना सराईत गुन्हेगार असं म्हटलं आहे. त्यावर खडसेंनी देखील प्रत्युत्तर दिलं आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या संदर्भातला गुन्हा त्यांच्यावर दाखल आहे. ते किती मोठे गुन्हेगार आहेत', अशी टीका चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. त्यांच्या टीकेला एकनाथ खडसेंनी प्रत्युत्तर दिलं आहे.रक्षा खडसे यांची प्रतिमा ही देशभरात संयमी आणि शांत स्वभावाची व्यक्ती अशा स्वरूपाची आहे. तसेच माझ्यावर राजकीय गुन्हे वगळता साधी एक एनसी सुद्धा नाही. सराईत गुन्हेगार कुणाला म्हणतात? तर चंद्रकांत पाटील यांना म्हणतात. त्यांच्यावर कलम ३०७ चा गुन्हा दाखल होता. राजकीय गुन्हे सोडून द्या. पण ३०७ चा गुन्हा दाखल होता. नंतर त्यांना तडीपारची नोटीस तयार होती. ह्यांना म्हणतात सराईत गुन्हेगार', अशी प्रतिक्रिया एकनाथ खडसे यांनी दिली.

## रुपाली ठोंबरेंची राजकीय दिशा अखेर ठरली; कोणत्या पक्षात प्रवेश करणार?

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातील नेत्या रुपाली पाटील ठोंबरे या मागील काही दिवसांपासून चर्चेत आहेत. राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यासोबत सुरू असलेल्या राजकीय संघर्षानंतर रुपाली ठोंबरे यांनी काही दिवसांपूर्वी पक्षाच्या विविध पदांचा राजीनामा दिल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर राष्ट्रवादीत अस्वस्थ असलेल्या रुपाली ठोंबरे नेमक्या कोणत्या पक्षात प्रवेश करणार, याबाबत तर्क वितर्क लढवले जात असून आता ठोंबरे यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टने राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

रुपाली ठोंबरे यांनी फेसबुकवर दोन फोटो पोस्ट करत आपल्या राजकीय विरोधकांवर निशाणा साधला आहे. तसंच भविष्यातील राजकीय वाटलाचीबद्दल संकेत दिले आहेत. रुपाली ठोंबरे यांनी म्हटलं की, 'पहिला फोटो २००५ मधील आहे बरं का. तेव्हापासून समाजात, राजकारणात स्वतःच्या जीवावर मनगटाच्या ताकदीवर आणि कामाच्या जोरावर काम करण्यास सुरुवात केली. दुसरा फोटो महाराष्ट्रातील ज्येष्ठ, दिग्गज नेते, जबरदस्त आवडते नेते हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि मा. शरदचंद्र पवार साहेब. त्यामुळे आयरे गैरे नथू खैरे,नटरंगी लोकांनी शिकवू नयेच,' असा इशारा रुपाली ठोंबरे यांनी दिला आहे.रुपाली ठोंबरे यांनी शरद पवार यांच्यासोबत आपला एक फोटो पोस्ट केला आहे, तर दुसऱ्या फोटोत शरद पवार आणि दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा एकत्रित फोटो आहे. दोन्ही फोटोत शरद पवार यांचा समावेश असल्याने रुपाली ठोंबरे या अजित पवारांच्या राष्ट्रवादीतून बाहेर पडत शरद पवारांच्या राष्ट्रवादीची तुतारी हाती घेणार का, अशी चर्चा आता



रंगू लागली आहे. तसंच या फोटोंमधून आणखी एक शक्यता वर्तवली जात आहे. रुपाली ठोंबरे यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या शिवसेना प्रवेशाचा अंदाज वर्तवला जात आहे. अशा स्थितीत त्यांनी आज सोशल मीडिया पोस्टमध्ये दिवंगत बाळासाहेब ठाकरेंचा फोटो शेअर केल्याने त्या शिवसेना प्रवेशाच्या तयारीत आहेत का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.राष्ट्रवादीकडून नुकतीच पुणे शहराची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये रुपाली ठोंबरे यांची मनधरणी करत नवी पक्षाने नवी जबाबदारी दिल्याची चर्चा होती. परंतु रुपाली ठोंबरे यांनी याबाबत वेगळी माहिती दिली आहे. 'माझी पुणे शहर कार्याध्यक्षपदी नियुक्ती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ६ महिन्यांपूर्वीच केली होती. नुकत्याच जाहीर केलेल्या कार्यकारिणीत माझी कोणतीही फेरनियुक्ती नाही, याची नोंद घ्यावी,' असं आवाहन ठोंबरे यांनी प्रसारमाध्यमांना केलं आहे.

# पोलिसांनी सापळा रचला अनब कुख्यात बाबाला अटक

**नागपूर :** नागपूर पोलिसांनी एका कुख्यात गुन्हेगाराला अटक केली आहे. तो एका खून प्रकरणात जेलमध्ये होता. तसेच तो जामिनावर जेलमधून बाहेर पडला. यानंतर तो आता ड्रग्जची तस्करी करताना पकडला गेला आहे. पोलिसांनी सापळा रचून या कुख्यात आरोपीला अटक केली आहे. पोलिसांच्या या कारवाईची सध्या नागपुरात चर्चा होत आहे. विशेष म्हणजे हा आरोपी ड्रग्जची विक्री का करत होता? याचं कारणदेखील समोर आलं आहे. उधारीच्या पैशांची परतफेड करण्यासाठी त्याने ड्रग्ज विक्रीचा मार्ग अवलंबल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी या आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. तसेच पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. आरोपीला नेमके ड्रग्ज कोणी दिले, तसेच या प्रकरणात आणखी कुणाचा समावेश होता का? याबाबतच्या तपासात आगामी काळात कदाचित महत्त्वाची माहिती मिळू शकते.हेअर प्लान्टेशनसाठी आणि खुनाच्या गुन्ह्यात जामिनावर सुटण्यासाठी झालेल्या खर्चाची परतफेड करण्याकरिता



एमडी विक्री करणाऱ्या कुख्यात गुन्हेगाराला कळमना पोलिसांनी सापळा रचून अटक केली. कादिर ऊर्फ बाबा जाकीर खान असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तो २३ वर्षांचा असून कळमनाच्या गुलशननगर येथील राहणारा आहे. बाबा हा कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्याविरूद्ध ड्रग्ज तस्करी आणि खुनासह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. एका खूनप्रकरणात बाबा हा कारागृहात होता. जामीन मिळविण्यासाठी त्याला लाखो रुपयांचा खर्च आला. यासाठी त्याच्या नातेवाइकांनी खर्च केले.

हेअर प्लान्टेशनसाठी आणि खुनाच्या गुन्ह्यात जामिनावर सुटण्यासाठी झालेल्या खर्चाची परतफेड करण्याकरिता एमडी विक्री करणाऱ्या कुख्यात गुन्हेगाराला कळमना पोलिसांनी सापळा रचून अटक केली. कादिर ऊर्फ बाबा जाकीर खान असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तो २३ वर्षांचा असून कळमनाच्या गुलशननगर येथील राहणारा आहे. बाबा हा कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्याविरूद्ध ड्रग्ज तस्करी आणि खुनासह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. एका खूनप्रकरणात बाबा हा कारागृहात होता. जामीन मिळविण्यासाठी त्याला लाखो रुपयांचा खर्च आला. यासाठी त्याच्या नातेवाइकांनी खर्च केले.

जामिनावर सुटल्यानंतर आरोपी बाबा याने हेअर ट्रान्सप्लान्टेशन केले. यासाठीही त्याला मोठ्या प्रमाणात पैसे लागले. ही रक्कम त्याने उधार घेतली. उधार घेतलेल्या पैशांची परतफेड करण्यासाठी त्याने ड्रग्ज विक्रीला सुरुवात केली. बाबाने मुंबईहून एमडीची मोठी खेप बोलावल्याची माहिती कळमना पोलिसांना मिळाली. पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यांच्या मार्गदर्शनाखाली कळमना पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण काळे, निरीक्षक गणेश धुमाळ, साहाय्यक पोलिस निरीक्षक शशिकांत मुसळे, हेडकॉन्स्टेबल प्रमोद कंगलो, विशाल भैसारे, नितीन, ललित, अविनाश, अजय यांनी शनिवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास गुशलननगर परिसरात सापळा रचला.पोलिसांना बाबा हा मोटारसायकलवर जाताना दिसला. पोलिसांनी त्याला आवाज दिला. पोलिसांना बघताच तो पळायला लागला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडती घेतली असता त्याच्याकडून २५.२० ग्राम एमडी पावडर, मोटारसायकल आणि दोन मोबाइलसह ३ लाख ६१ हजार रुपये किमतीचे साहित्य जप्त केले. मुंबईहून एमडी आणल्याचे सांगत खर्चाची परतफेड करण्यासाठी अंमली पदार्थाची विक्री करीत होतो, अशी माहिती त्याने दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून बाबाला अटक केली. त्याची पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

## हृदयद्रावक अपघात, दोन जिवलग मित्रांनी एकाचवेळी प्राण सोडला

**सांगली :** जतच्या शेगाव रस्त्यावर एका भीषण अपघातात दोन जिवलग मित्रांचा दुर्दैवी मृत्यू झाला. बनाळी फाट्याजवळ ट्रक आणि मोटरसायकलची समोरासमोर धडक झाली. या अपघातात सचिन गणेश व्हनमाने (वय २१) आणि कामान्ना संगप्पा हत्तळी (वय २५) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. दोघेही चिक्कलगी, तालुका मंगळवेढा, जिल्हा सोलापूर येथील रहिवासी होते.सचिन आणि कामान्ना मोटरसायकलवरून शेगावकडून जतच्या दिशेने येत होते, तेव्हा समोरून येणाऱ्या मालवाहतूक ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत कामान्ना यांचा जागीच मृत्यू झाला, तर सचिन यांना रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. जत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघाताची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.हा हृदयद्रावक अपघात जत तालुक्यातील शेगाव रस्त्यावर बनाळी फाट्याजवळ घडला. सचिन गणेश व्हनमाने आणि कामान्ना संगप्पा हत्तळी हे दोघे



जिवलग मित्र एकाच मोटरसायकलवर प्रवास करत होते. ते शेगावहून जतच्या दिशेने येत असताना, भरधाव वेगाने येणाऱ्या एका मालवाहतूक ट्रकने त्यांच्या मोटरसायकलला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण धडकेमुळे मोटरसायकलचा चक्काचूर झाला. अपघाताची तीव्रता इतकी जास्त होती की, कामान्ना हत्तळी यांचा जागीच मृत्यू झाला. तर सचिन व्हनमाने गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने उपचारासाठी जत येथील रुग्णालयात नेण्यात येत होते. मात्र, दुर्दैवाने रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेतच सचिन यांनीही प्राण सोडले.

## तिने चार मुलांना बुडवून संपवलं, तिलाही तसंच

**पानिपत :** हरियाणातील पानिपत येथील सहा वर्षांच्या विधीच्या संशयास्पद मृत्यूचा तपासातून इतकं भयानक सत्य समोर येईल याचा कोणी विचारही केला नसेल. कुटुंबियांना विधीचा मृत्यू हा अपघात वाटत होता. मात्र, पोलिसांच्या तपासात वेगळंच सत्य समोर आलं. विधीचा मृत्यू अपघात नव्हता तर तिची हत्या करण्यात आली होती. इतकंच नाही तर ज्या महिलेनी तिची हत्या केली होती, त्या पूनमने यापूर्वी आणखी तीन मुलांची हत्या केली होती. पोलिसांनी तिला चार मुलांच्या हत्येच्या आरोपाखाली अटक केली आहे.

पोलिस चौकशीत पूनमने जे उघड केले ते सर्वांना हादरवून टाकणारे होते. तिने कबूल केले की तिने केवळ तिच्या भावजयची मुलगी विधीलाच बुडवून मारले नाही. तर, स्वतःचा तीन वर्षांचा मुलगा शुभम याचीही तिने त्याच पद्धतीने हत्या केली. त्याशिवाय तिने ननंदेची मुलगी इशिका आणि भावाची मुलगी जियाचीही हत्या केली. कुटुंबियांना असे वाटले की चारही मुलांचे मृत्यू अपघात आहेत, परंतु तसं नव्हतं.

## कळंबोली येथील टपरी चालकाला का संपवलं? आरोपींच्या मुसक्या आवळल्या

**नवी मुंबई :** कळंबोली स्टील मार्केट परिसरात टपरी चालकाची निर्घृण हत्या करणाऱ्या दोन आरोपींना गुन्हे शाखा, कक्ष ३ ने अवघ्या २४ तासांत अटक केली आहे. मोहम्मद चाँद शाबीर शेख आणि जुएफ जमिल इलियास शेख अशी आरोपींची नावे आहेत. तृतीयपंथीयांसोबत झालेल्या किरकोळ वादातून संतापाच्या भरात त्यांनी टपरी चालकावर जीवघेणा हल्ला केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. न्यायालयाने दोघा आरोपींना ८ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.संबंधित हत्येची घटना ही १ डिसेंबरला पहाटे १.४५ वाजेच्या सुमारास घडली. ३७ वर्षीय टपरी चालक रत्नेश कुमार राजकुमार जैस्वाल आपलं काम आटोपून घरी जात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्याचा रस्ता अडवला. पाहता पाहता आरोपींनी हाताबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्याने त्याला बेदम मारहाण केली. हल्ल्यानंतर दोन्ही आरोपी काही सेकंदांतच स्कूटीवरून पळून गेले. तर गंभीर जखमी झालेले जैस्वाल यांचा मृत्यू झाला.



कळंबोली पोलिसांनी तत्काळ दोन अज्ञात आरोपींवर खूनाचा गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत गुन्हे शाखेने कळंबोली पोलिसांसह समांतर तपास सुरू केला. सहायक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये आरोपी स्कूटीवरून येताना आणि घटनास्थळ सोडताना स्पष्ट दिसले. तांत्रिक तपास आणि प्रत्यक्षदर्शी माहितीच्या आधारे पथकाने आरोपींचा ठावठिकाणा शोधत मोहम्मद चाँद आणि जुएफ जमिल या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान दोन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.

# पोलिसांचा कॅफेवर छापा, कॉलेज तरुण-तरुणी विचित्र अवस्थेत सापडले; स्पेशल रूम अनब दर तासाला...; शहरात खळबळ

**कोल्हापूर :** गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असलेल्या इचलकरंजी शहरात अजून एक घटना उघडकीस आली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये असणाऱ्या एका कॅफेमध्ये पोलिसांनी छापा टाकल्यानंतर धक्कादायक दृश्य पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. अश्लील कृत्यासाठी या कॅफेमध्ये चक्क स्पेशल जागा तयार करण्यात आली होती. याप्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करुन कॅफेचालकावर कारवाई केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, इचलकरंजी शहराच्या मध्यवर्ती झेंडा चौक परिसरातील प्रसिद्ध 'कॅफे अड्डा'वर कोल्हापूर निर्भया पथकाने शुक्रवारी सायंकाळी अचानक छापा टाकून बेकायदेशीर आणि अश्लील कारभार चव्हाट्यावर आणला. कॅफेच्या नावाखाली जोडप्यांना ३५० रुपये प्रति तास भाड्याने 'स्पेशल रूम' उपलब्ध करून देऊन अश्लील कृत्यांना प्रोत्साहन दिल्याचे



धक्कादायक सत्य उघड झाले. या कारवाईत कॅफे मालक संकेत शिवपुत्र हुबळे (वय २५, रा. कोरोची) आणि व्यवस्थापक शैलेश अनिल चंदूरे (वय २६, रा. शेळके मळा) यांना ताब्यात घेऊन गावभाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इचलकरंजी शहरात शाळा-कॉलेज परिसरात कॅफेची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्यातच काही ठिकाणी तरुण-तरुणींना आकर्षित करून बेकायदेशीर धंदे चालवले जात असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे पोहोचल्या होत्या. त्यामुळे खात्रीशीर माहितीच्या आधारे निर्भया पथकातील कर्मचारी 'तोतया ग्राहक' बनून कॅफेत घुसले. तिथे जोडप्यांसाठी दोन स्वतंत्र रूम्स, वाढदिवसासाठी वेगळी खोली आणि सर्वांत धक्कादायक 'स्पेशल रूम'ची व्यवस्था आढळली. या रूममध्ये कंडोम पाकिटे सापडली आहेत. तर बाथरूममध्ये अश्लील कृत्यांसाठी अनुकूल वातावरण तयार केलेले होते. छापा पडताच उपस्थित तरुण-तरुणींमध्ये एकच खळबळ उडाली, अनेकजण बाहेर पडण्याचा प्रयत्नात होते.जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, अप्पर पोलीस अधीक्षक अण्णासाहेब जाधव आणि उपविभागीय अधिकारी विक्रांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक संभाजी भोस्कर, महादेवी पुजारी, प्रियंका चौगुले व सिद्धार्थ शेटे यांच्या पथकाने ही कारवाई केली. तपासात कॅफेची बाहेरील दारे बंद करून गोपनीय प्रवेशमार्ग, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दिशा बदललेली असल्याचे निष्पन्न झाले. कारवाईदरम्यान काही कॉलेज विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि बाहेरगावातील ग्राहक आढळले. पालकांना बोलावून समज देऊन त्यांना सोडून देण्यात आलेया कारवाईची बातमी पसरताच इचलकरंजीतील अनेक कॅफे चालकांची गावभाग पोलीस ठाण्यासमोर गर्दी केली. निर्भया पथकाच्या धाडसामुळे संशयास्पद कॅफे चालकांमध्ये भीती पसरली असून, शहरात कॅफेच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर आता कडक कारवाई होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, पोलिसांनी तातडीने कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असून, अधिक तपास सुरू आहे. तर या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# जयस्वालची सेंच्युरी, हिटमॅनची तोडफोड बॅटिंग पण राहुल म्हणतोय दोन खेळाडूंनी फिरवली

**मुंबई :** भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने ९ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारताने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली. केएल राहुलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला नमवून मालिका खिशात घातली. भारताने दक्षिण आफ्रिकेचा ९ गडी राखून पराभव केला. या विजयामुळे भारताने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.

सामना जिंकल्यानंतर भारतीय संघाचा कर्णधार के.एल. राहुलने संघाच्या काम गिरीचे कौतुक केलेपहिला टॉस असेल ज्यानंतर टीमने माझ्याकडे पाहून बघून हसत होती आणि टॉस जिंकल्यावर माझा त्यांना अभिमान वाटला असेल.



खरं म्हणजे हे गरजेचं होतं, पहिल्या दोन सामन्यांमध्ये आम्ही कठीण परिस्थितीचा सामना केला होता. ओल्या खेळपट्टीवर गोलंदाजांना ब्रेक देणे चांगले राहिलं. पिच चांगली होती आणि आम्ही अनेक विकेट्स मिळवल्या. आम्हाला माहीत होते की जी टीम आक्रमक क्रिकेट खेळत आहे, ती० धावांचा पाठलाग करू शक ४०ते आणि पण सलग विकेट्स गम ावल्याने लवकर ऑल आऊटही होऊ शकते. प्रसिद्धने ज्या २-३ विकेट्स घेतल्या त्या महत्त्वाच्या होत्या, मग कुलदीपनेही विकेट्स काढल्या. याच पद्धतीने एकदिवसीय सामन्यात तुम्ही संघांवर दबाव निर्माण करता, असं के. एल. राहुल म्हणाला.२७१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जयस्वाल आणि रोहित शर्मा या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी १५५ धावांची भागीदारी केली. या भागीदारीम ुळे भारताला शानदार सुरुवात मिळाली. दोन्ही फलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. रोहित शर्माने ७३ चेंडूंमध्ये सात चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ७५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

यशस्वी जैस्वालने १२१ चेंडूंमध्ये १२ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ११६ धावांची खेळी केली विराट कोहलीने ४० व्या षटकातील लुंगी एन्गिडीच्या पाचव्या चेंडूवर चौकार मारून भारताला विजय मिळवून दिला.दरम्यान, भारतासाठी हा सामना महत्त्वाचा होता. कारण पहिल्या दोन सामन्यांमध्ये दोघांनी एक-एक विजय मिळवला. त्यामुळे मालिका जिंकण्यासाठी दोघांसाठी विजय मिळवणं गरजेचं होतं. भारतीय संघाने मुंसडी मारत मालिका जिंकली. स्टार खेळाडू विराट कोहली याला मालिकावीर म्हणून गौरवण्यात आले.

# कोहलीने गौतम गंभीर यांना हाणला जोरदार टोला, म्हणाला मी आणि रोहित शर्मा..

**विशाखापट्टणम :** भारताने तिसरा वनडे सामना जिंकला आणि मालिकाही खिशात घातली. विराट कोहलीने या मालिकेत सर्वाधिक धावा केल्या, त्यामुळे त्याला मालिकावीर हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. पण त्यानंतर विराट कोहलीने रोहित शर्माचे नाव घेत गौतम गंभीर यांना जोरदार टोला हाणल्याचे पाहायला मिळाले.विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना गौतम गंभीर यांनी कसोटी संघातून काढून टाकले. त्यानंतर रोहित शर्माला वनडे संघाच्या कर्णधारपदावरून हटवले. गौतम गंभीर यांनी ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यापूर्व रोहित आणि विराट या दोघांवर टांगती तलवार ठेवली होती. यावेळी गौतम गंभीर हे विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना दुर्लक्ष करत होते. पण त्यानंतर रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाचा दौरा गाजवला. या दौऱ्यात सर्वाधिक धावा या रोहित शर्माच्या नावावर होत्या, त्यानंतर



या घरच्या मालिकेत सर्वाधिक धावा या विराट कोहलीच्या नावावर आहेत. त्यामुळे हा अखेरचा वनडे सामना संपला आणि त्यानंतर विराट कोहलीने थेट रोहित शर्माचे नाव घेत गौतम गंभीर यांना जोरदार टोला हाणला आहे.विराट कोहली सामना संपल्यावर म्हणाला की, ' ही मालिका मला बरेच काही देऊन गेली आहे. कारण या मालिकेत माझा मनासारखा खेळ झाला, त्यामुळे मी समाधानी आहे. मी स्वत:साठी ठरवलेले माझे स्वत:चा स्तर यावेळी राखण्याचा प्रयत्न केला आहे आणि संघावर प्रभाव पाडू शकणाऱ्या स्तरावर खेळण्याचा प्रयत्न केला आहे. मला माहित आहे की, जेव्हा मी अशा प्रकारे फलंदाजी करू शकतो तेव्हा ते संघाला मोठ्या प्रमाणात मदत करते. आणि फक्त आत्मविश्वासाने तुम्हाला म ध्यंतरी कोणत्याही परिस्थितीचा अनुभव येतो. मला माहित आहे की परिस्थिती ही कशी हाताळयची असते आणि संघाला विजयापर्यं कसे पोहोचवायचे असते. जेव्हा माझ्यावर कोणतेही दडपण नसते, तेव्हा मी मोठी खेळी साकारतो. या मालिकेत जी पहिली खेळी मी साकारली, ती माझ्यासाठी महत्वाची ठरली. या खेळीमुळे आत्मविश्वास वाढला. कारण ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यानंतर मी क्रिकेट खेळलोच नव्हतो. हा करो या मरो सामना आमच्यासाठी चांगला ठरला. एक गोष्ट मात्र आवर्जुन सांगायला हवी आणि ती म्हणजे मी आणि रोहित शर्मा अजूनही भारतीय संघासाठी विजय मिळवून देण्याचे

# स्मृतीबरोबर लग्न मोडताना पलाश मुच्छलने कोणाला ठरवलं दोषी

**नवी दिल्ली :** अखेर स्मृती मानधना आणि पलाश मुच्छल यांचं लग्न मोडलं. स्मृती म ानधना आणि पलाश मुच्छल या दोघांनीही लग्न मोडताना आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. स्मृती मानधनाने ही माझी वैयक्तिक बाब आहे आणि ती तशीच राहायला हवी, यासाठी चाहत्यांना विनंती केली आहे. पण दुसरीकडे पलाश मुच्छलने आपल्या भावना व्यक्त करताना कोणावर कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत, हे आता समोर आले आहे.स्मृती आणि पलाश यांच्या लग्नाचा काही मिनिटं शिल्लक असताना तिच्या वडिलांना हार्ट अटॅक आला होता. त्यानंतर स्मृती मानधनाने आपलं लग्न पुढे ढकलले असल्याचे सांगितले होते. पण आज रविवारी स्मृती अखेर हे लग्न होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. पण हे सर्व घडत असताना पलाशची पोस्ट मात्र जोरदार व्हायरल झाली आहेमी माझ्या आयुष्यात पुढे जाण्याचा आणि म ाझ्या वैयक्तिक नात्यांपासून दूर जाण्याचा



निर्णय घेतला आहे. माझ्यासाठी हा खूप कठीण काळ आहे, कारण लोक विचारांना आधार नसलेल्या निराधार अफवांवर आंधळेपणाने विश्वास ठेवत आहेत. हे नाते माझ्यासाठी खूप पवित्र आहे आणि त्यावर पडताळणी न केलेल्या माहितीचे ओझे टाकल्याने खूप दुख होते. एक सम ाज म्हणून, आपण कोणाबद्दलही निष्कर्ष काढण्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे; अन्यथा, आपले शब्द कायम राहणाऱ्या जखमा सोडतात. माझी टीम खोटी आणि बदनामीकारक माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करेल. या कठीण काळात माझ्या पाठीशी जे उभे राहिले होते त्यांचे मी मनापासून आभार मानतो.

# दक्षिण आफ्रिकेच्या कोचवर आली तोंड लपवण्याची वेळ

**विशाखापट्टनम :** भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात एकदिवसीय मालिका रंगली. ही मालिका २-१ ने भारताने जिंकली. भारताने पहिला आणि कालचा सामना जिंकला. दुसरा सामना दक्षिण आफ्रिकेने जिंकला होता. याआधी दक्षिण आफ्रिकेने कसोटी मालिका जिंकली होती. जेव्हा दक्षिण आफ्रिकेने कसोटी मालिका जिंकली होती तेव्हा त्यांचे प्रशिक्षक भारताबद्दल जे म्हणाले होते आता त्या विधानावरुन त्यांनी यू-टर्न घेतला आहे.भारत दौऱ्यावर असताना दक्षिण आफ्रिका कसोटी मालिका जिंकण्याच्या जवळ आली होती, तेव्हा त्यांचे प्रशिक्षक शुक्री कॉनराड यांनी भारतीय संघाने लोटांगण घालावे असे विधान केले. अनेक भारतीय दिग्गज खेळाडूंनी शुक्री कॉनराडकडून माफी मागण्याची मागणी केली. एकदिवसीय मालिकेतील पराभवानंतर शुक्री कॉनराडने स्वतः कबूल केले की त्यांनी वेगळा शब्द वापरायला हवा होता.दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ ने टीम इंडियाने जिंकली. विराट कोहलीने तीन सामन्यांमध्ये १५१ च्या सरासरीने ३०२ धावा केल्या, ज्यामध्ये दोन शतके समाविष्ट आहेत, तर रोहित शर्मानेही उत्कृष्ट फलंदाजी केली. कोहली आणि रोहितच्या शानदार फलंदाजीमुळे



मालिका गमावल्यानंतर, दक्षिण आफ्रिकेचे प्रशिक्षक शुक्री कॉनराड यांनी 'लोटांगण घालावे' या विधानावर मौन सोडत म्हटले,सर्वप्रथम, माझा कधीही कोणालाही दुखावण्याचा हेतू नव्हता. मी कदाचित यापेक्षा चांगला शब्द निवडू शकलो असतो, कारण या शब्दाच्या वापरामुळे लोकांना विविध अर्थ लावण्याची संधी मिळाली आहे. मला नेहमीच वाटत असे की आम्हाला टीम इंडियाने मैदानावर जास्त वेळ घालवावा आणि त्यांच्यासाठी अडचणी निर्माण कराव्यात अशी आमची इच्छा होती. आता मला समजले आहे की भविष्यात आपण शब्दांचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे, कारण कोणत्याही गोष्टीचा वेगळा अर्थ लावता येतो.

गुवाहाटी कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारतासमोर ५४९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात भारताच्या हातात आठ विकेट्स होत्या आणि ते लक्ष्यापेक्षा ५२२ धावा कमी होते. दुसऱ्या कसोटीच्या शेवटच्या दिवसापूर्वी, दक्षिण आफ्रिकेचे प्रशिक्षक शुक्री कॉनराड यांनी भारतीय संघाबद्दल सांगितले की, त्यांनी शक्य तितके त्यांच्या पायावर उभे राहिले पाहिजे. आम्हाला असं हवं होतं की त्यांनी आमच्यासमोर लोटांगण घालावे. आम्ही त्यांना सांगितले की, 'हा शेवटचा दिवस आहे, एक तास तरी थांबा.' या विधानामुळे वाद निर्माण झाला आणि आता दक्षिण आफ्रिकेच्या प्रशिक्षकाने यू-टर्न घेतला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# इंडस्ट्रीतलं सर्वात नामांकित कुटुंब कपूर, पण केवळ एकाच सदस्याने पूर्ण केलंय शिक्षण

**मुंबई :** बॉलिवूडचे सर्वात मोठे खानदान किंवा सिनेसृष्टीला सर्वाधिक सुपरस्टार देणारे खानदान म्हणून ओळखले जाणारे कपूर घराणे नेहमीच वेगवेगळ्या कारणां मुळे चर्चेत असते. या कुटुंबातले बहुतांश जण सिनेपडदा गाजवणारे आहेत. या कुटुंबातील सदस्यांनी फॅशन डिझायनिंग, थिएटर आणि चित्रपट निर्मितीसह विविध क्षेत्रात शिक्षण घेतले आहे, तसेच त्यांचे नियमित शालेय शिक्षणही झाले आहे. पृथ्वीराज कपूर ते रिद्धिमा कपूर पर्यंत, प्रत्येक सदस्याचा शैक्षणिक प्रवास आज जाणून घेऊ.



पृथ्वीराज कपूर – कुटुंबातील सर्वात मोठे सदस्य असलेल्या पृथ्वीराज कपूर यांच्याबद्दल जाणून घेऊ. त्यांनी आपले शिक्षण लायलपूर खालसा कॉलेजमधून सुरू केले. नंतर पेशावरच्या एडवर्ड्स कॉलेजमधून कला शाखेत पदवी पूर्ण केली. अभिनयाकडे वळण्यापूर्वी त्यांनी काही काळ कायद्याचा अभ्यासही केला होता.राज कपूर – 'हिंदी चित्रपटाचे शोमॅन' म्हणून ओळखले जाणारे राज कपूर यांनी लहान वयातच चित्रपटांमध्ये प्रवेश केला. त्यांचे अधिकृत शिक्षण मर्यादित झाले, परंतु चित्रपटाच्या सेटवर काम करताना त्यांनी दिग्दर्शन आणि अभिनयाचे बारकावे शिकून घेतले. त्यांनी कर्नल ब्राउन केंब्रिज स्कूल, सेंट झेवियर्स कॉलेजिएट स्कूल आणि कॅम्पियन स्कूलमध्ये शिक्षण घेतले.राज कपूर यांचे भाऊ शम्मी कपूर – शम्मी कपूर यांनी न्यू एरा स्कूलमध्ये आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. तसेच काही काळ रुईया कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. पण ते, पृथ्वी थिएटरशी संबंधित असल्याने व चित्रपटांमध्ये प्रवेश केल्यामुळे त्यांचे शिक्षण अर्धवट राहिले.शशी कपूर – शशी कपूर यांनी मुंबईतील डॉन बॉस्को हायस्कूल आणि सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. नाटक आणि चित्रपटांमध्ये त्यांना प्रचंड आवड असल्याने त्यांनी पुढील शिक्षण न घेण्याचा निर्णय घेतला.

रणधीर कपूर – त्यांच्या पुढच्या पिढीत, रणधीर कपूर यांनी देहरादूनमधील कर्नल ब्राउन केंब्रिज स्कूलमध्ये शिक्षण घेतले, पण त्यांच्या पुढील शिक्षणाबद्दल फारसे माहिती नाही.बबिता आणि नीतू कपूर – बबिता कपूर यांनी पाचगणी येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केले, तर नीतू कपूर यांनी मुंबईतील हिल ग्रेंज हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले आणि लहान वयातच चित्रपटांमध्ये प्रवेश केला. रिद्धिमा कपूर – रिद्धिमा कपूर ही कपूर कुटुंबातील सर्वात सुशिक्षित सदस्य मानली जाते. तिने लंडनमधील अमेरिकन इंटरकॉन्टिनेंटल युनिव्हर्सिटीमधून डिझाइन आणि मार्केटिंगमध्ये बॅचलर पदवी मिळवली आणि नंतर रत्नशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण केला.रणबीर, करीना आणि करिश्मा कपूर – रणबीर, करीना आणि करिश्मा कपूर यांनी शाळा आणि कॉलेजमध्ये शिक्षण घेतले होते, परंतु अभिनय कारकिर्द लवकर सुरू केल्यामुळे त्यांना पदवी पूर्ण करता आली नाही.

## नवरा झोपेतून उठायच्या आधी मेक अप करायची अनब परत झोपायची





**पुणे :** आपल्या नवऱ्याला आपण सुंदर दिसायला हवं म्हणून बायका छान तयार होतात. नेटनेटकं राहतात. पण बॉलिवूडम धली एक अभिनेत्री होती. जी आपला नवरा झोपेतून उठायच्या आधीच मेकअप करायची. तिचा नवरा हा भारतीय क्रिकेट टीमशी निगडीत होता.

ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोण नसून करीना कपूरची सासू, सैफ अली खानची आई अभिनेत्री शर्मिला टागोर होत्या. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी त्या काळचे प्रसिद्ध दिग्दर्शक सत्यजित रे यांच्या 'अपूर संसार' (१९५९) या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. बॉलिवूडमध्ये येण्यापूर्वी, त्यांनी बंगाली चित्रपटसृष्टीत आपल्या उत्कृष्ट कामाने स्वतःला सिद्ध केले होते. त्यांचा पहिला हिंदी चित्रपट 'काश्मीर की कली' (१९६४) मध्ये आलेला. त्यात त्या शम्मी कपूर यांच्या सोबत दिसल्या होत्या. त्यांचा ग्लॅमर लूक प्रेक्षकांना खूप आवडला. हळूहळू त्या एक मोठ्या स्टार बनल्या. अलीकडेच, सोहा अली खानने शर्मिला टागोर यांच्याशी संबंधित एक किस्सा सांगितला. ऑल अबाउट हर' शोमध्ये सोहाने सोनाक्षी सिन्हाला आमंत्रित केलेले. तिथे त्यांनी प्रेम, नातेसंबंध, लग्न संसार यांसारख्या गोष्टींवर चर्चा सांगितल्या. या संभाषणादरम्यान, सोहाने तिची आई, ज्येष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोरबद्दल एक किस्सा सांगितला.सोहा म्हणाली, ' म ेकअप न करता ती आपला पती कुणाल खेमू सोबत अगदी आरामात वावरु शकते. पण माझ्या आईने मला एकदा सांगितले होते की जेव्हा तिचे लग्न झाले तेव्हा ती माझे वडील उठण्यापूर्वी उठायची, थोडा मेकअप वगैरे करायची आणि नंतर पुन्हा झोपायची कारण ती शर्मिला टागोर होती. तिला वाटायचे की तिच्या पतीने शर्मिला टागोरला पाहण्यासाठी उठले पाहिजे. तिने नेहमीच सुंदर दिसले पाहिजे. हे काही काळ चालू राहिले.' धर्मेंद्र, शम्मी कपूर, जितेंद्र आणि राजेश खन्ना यांच्यासोबत त्यांनी अनेक ब्लॉकबस्टर हिट चित्रपटांमध्ये काम केले. ६० आणि ७० च्या दशकात शर्मिला यांनी 'आराधना,' 'अमर प्रेम,' 'चुपके चुपके,' आणि 'डाग' सारख्या चित्रपटांमध्ये उत्कृष्ट अभिनय केला. राजेश खन्ना यांच्यासोबतची त्यांची जोडी सर्वात यशस्वी ठरली.

## तारक मेहता का उल्टा चष्मा' बंद होणार?

**मुंबई :** तारक मेहता का उल्टा चष्मा ' ही लोकप्रिय मालिका गेली अनेक वर्ष प्रेक्षकांचे मनोरंजन करते आहे. गेल्या १७ वर्षांपासून सुरू असणाऱ्या या मालिकेने मोठा चाहतावर्ग कमावला. यातील प्रत्येक पात्राने देशभरात लोकप्रियता मिळवली आहे. जेठालाल, दयाबेन, गोकुळधाम सोसायटीमधील सर्व मंडळी असो किंवा टप्पू सेना... ही पात्रे घराघरात प्रसिद्ध झाली. मात्र, अलिकडेच अशी अफवा पसरली आहे की, तारक मेहता का उल्टा चष्मा लवकरच बंद होणार आहे. TMKOC च्या प्रेक्षकांसाठी ही बातमी खूपच धक्कादायक आहे, आता याविषयी निर्माते असित कुमार मोदी यांनी भाष्य केले. त्यांनी हा शो किती काळ चालू



ठेवण्याची त्यांची योजना आहे हे उघड केले आहेतारक मेहता का उल्टा चष्मा' ही २००८ पासून सुरू झालेली मालिका आहे. तेव्हापासून १७ वर्षांपासून अधिक काळ या मालिकेने प्रेक्षकांचे मनोरंजन केले. तेव्हापासून ही मालिका भारतातील सर्वात आवडत्या मालिकांपैकी एक आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून या मालिकेम धून अनेक कलाकारांनी एक्झिट घेतली. मालिकेच्या सेटवरुन अनेक वादही समोर आले. त्यामुळे मालिकेसंदर्भात प्रेक्षकांची नाराजी वाढली होती आणि आता काळात शो बंद होणार की काय, अशी चर्चा रंगली.शोचे निर्माते असित कुमार मोदी यांनी अलिकडेच बोलताना ही मालिका किती काळ चालेल याचा खुलासा केला. त्यांनी इंडियन टेलिव्हिजन अकादमीच्या २५ व्या वर्धापन दिन सोहळ्याला हजेरी लावली. त्यावेळी त्यांनी या चर्चेविषयी भाष्य केले.असित यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, 'हा शो अजूनही चालू आहे आणि जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत आम्ही ही मालिका करू. मला वाटते की, ही मालिका अजूनही प्रेक्षकां आवडते आणि 'तारक मेहता का उल्टा चष्मा' हा एकमेव असा शो आहे, जो हास्य आणि आनंद देतो.

## पवन सिंहला बिश्नोईकडून धमकी

**मुंबई :** भोजपुरी सुपरस्टार पवन सिंहला धमकी मिळाली आहे. रिपोर्टनुसार, गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा फोन आला आहे. 'बिग बॉस १९' च्या ग्रँड फिनालेमध्ये सलमान खानसोबत स्टेज शेअर करणार असल्यामुळे अभिनेत्याला धमकी देण्यात आली. ग्रँड फिनालेम ध्ये त्याच्या नियोजित उपस्थितीच्या आधी ही धमकी देण्यात आली होती.फोन करणाऱ्यानं स्वतःची ओळख बिश्नोई टोळीचा सदस्य म्हणून करून पवन सिंगला ग्रँड फिनालेमध्ये सहभागी होण्यापासून रोखण्याचा इशारा दिला. फोन



करणाऱ्यानं म्हटलं आहे की, 'जर त्याने सलमान खानसोबत स्टेज शेअर केला तर तो पुन्हा कधीही काम करू शकणार नाही.' अभिनेत्याकडून मोठ्या प्रमाणात पैसेही मागितले गेले. घटनेनंतर लगेचच पवन सिंहच्या टीमने सुरक्षा यंत्रणांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी मोबाईल नंबर आणि कॉल डिटेल्सच्या आधारे तपास सुरू केला आहे.पवन सिंह हा भोजपुरी इंडस्ट्रीतील सर्वात लोकप्रिय चेहऱ्यांपैकी एक आहे आणि अलिकडच्या 'बिग बॉस १९' च्या फिनालेमध्ये त्याच्या उपस्थितीबद्दल बरीच खळबळ उडाली होती. धमकी मि ळाली असूनही, अभिनेत्यानं शोमध्ये उपस्थित राहण्याचा निर्णय घेतला. प्रकरण लक्षात घेता, पोलिसांनी सुरक्षा वाढवली आहे आणि कॉलचा शोध घेत आहेत.पवन सिंह 'लाफ्टर शेफ्स सीझन ३' च्या एका भागात दिसला होता. यामध्ये त्यानं सर्व स्पर्धकांसोबत 'स्त्री २' मधील एका गाण्यावर डान्स केला होता. त्यानं यापूर्वी 'राईज अँड फॉल' मध्ये भाग घेतला होता. या शोमध्ये त्याची धनश्री वर्मासोबत चांगली मैत्री झालेली.१९९८ मध्ये, 'हम साथ साथ हैं' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान जोधपूरमध्ये काळवीट शिकार प्रकरण घडलं होतं, ज्यामध्ये सलमान खानला आरोपी ठरला होता. बिश्नोई समुदाय काळवीट हा एक पवित्र प्राणी मानतो आणि त्याची हत्या करणं त्यांच्या धार्मिक श्रद्धेचा गंभीर अपमान मानतो.

# दत्त जयंती निमीत्त श्री गुरुचरित्र पारायण सप्ताहाची महाप्रसादाने सांगता

जनसंचलन/बुलढाणा

येथील राजे संभाजी नगर स्थित श्री संत गंगामाई स्थापीत जागृत श्री दत्त मंदीर येथे सालाबादाप्रमाणे यंदाही श्रीदत्त जयंती निमीत्त श्री गुरुचरीत्र पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची आज (दि.६) डिसेंबर रोजी महाप्रसादाने सांगता करण्यात आली. श्री दत्त मंदीर येथे (दि.२८) नोव्हेंबर ते (दि.५) डिसेंबर दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दररोज सकाळी ८ ते १० श्री सत्यदत्त पुजा व अभिष्क्षेक, सप्तशक्ती पाठ, सकाळी १० ते दुपारी ३ श्री गुरुचरित्र पारायण व सायंकाळी ६.३० ते ७ नामस्मरण, आरती. (दि.२८) नोव्हेंबर रोजी ३ ते ६ श्रीराम जानकी महिला भजनी मंडळ बुलढाणा, रात्री ८ ते १० पो.कॉ. श्रीकृष्ण चव्हाण व सहकारी धामणगाव बढे, (दि.२९) नोव्हेंबर दुपारी ३ ते ६ श्री गजानन महिला भजनी मंडळ आणि संच, रात्री ८ ते १० सुयोग भजनी मंडळ आणि संच यांचे किर्तन, (दि.०४) डिसेंबर रोजी श्री गणपती मंदीर सराफा लाईन बुलढाणा यांची काकड आरती पार पडली. सायंकाळी ४ ते ६ हभप अनंत महाराज चिंचोळकर



यांचे दत्तजन्म उत्सव व त्यानंतर सायंकाळी ५.४६ वाजता पालखी मिरवणूक, पाळण व आरती, सायंकाळी ७ ते १० मिरवणूक, (दि.०५) डिसेंबरला दुपारी ४ ते ६ गोपाळकाला प्रित्यथ हभप अनंत महाराज चिंचोळकर बुलडाणा यांचे काल्याचे किर्तन पार पडले. आज शनिवारी (दि.०६) डिसेंबर रोजी श्री गुरुचरीत्र पारायण सप्ताहाची वरण, भात, पोळी, भाजी, गोड शिऱ्याच्या प्रसादाचे वितरण करण्यात करुन सांगता करण्यात आली. यावेळी असंख्य दत्त भक्तगण व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सोहळ्याला श्रीदत्त मंदीर ट्रस्ट, बुलडाणा व समस्त दत्त भक्तगण मंडळींनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातील उमेदवारांना इस्राईलमध्ये रोजगाराची संधी

जनसंचलन/बुलढाणा




राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्राईल देशात बांधकाम नुतनीकरण या क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध करण्यात आली आहे. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. यामध्ये सिरॅमिक टायलिंगसाठी १००० जागा, ड्रायवॉल वर्कर्स ३०० जागा व मेसनच्या ३०० जागांची भरती करण्यात येणार आहे. या रोजगारासाठी उमेदवारांस इंग्रजी भाषेचे सामान्यज्ञान, दहावी उत्तीर्ण तसेच वय २५ ते ५० वयोगटाचे उमेदवार पात्र आहेत. यासोबत उमेदवारांकडे किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. अधिकमाहितीवनोंदणीसाठी https://maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावीआपली नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे


# जागतिक एड्स दिनानिमित्त शहरात मोटारसायकल रॅली

जनसंचलन/बुलढाणा

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण संस्था तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आज शहरात जनजागृतीसाठी मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. सदर मोटारसायकल रॅलीस वै. अ. जिल्हा क्षयरोग केंद्र बुलढाणा डॉ. दिनकर खिरोडकर, कार्यक्रम व्यवस्थापक प्रमोद टाले, जिल्हा पीपीएम समन्वयक सिद्धेश्वर. ना.सोळुंकी, जिल्हा समन्वयक अनिल श्रीराम सोळंके, जिल्हा पर्यवेक्षक गजानन देशमुख उपस्थित होते.या रॅलीच्या माध्यमातुन एड्सविषयी जनजागृती तपासणीचे महत्व, उपचारांची उपलब्धता आणि एचआयव्हीग्रस्तांबाबत सहानुभूतीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा मुख्य उद्देश होता. ही रॅली जिल्हा रुग्णालय परिसरातून सुरू होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरत जनजागृतीपर संदेश देत पूर्ण झाली. या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, आरोग्य कर्मचारी, एनजीओ प्रतिनिधी, विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमात एड्स प्रतिबंधासाठी ङ्कङ्कलवकर तपासणी,नियमित उपचार,शून्य भेदभावफ्फ हा संदेश देत एचआयव्ही/एड्सविषयीचे गैरसमज दूर करण्याचे आवाहन करण्यात आले.

# अमरावती शिक्षक मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी जाहीर

## जिल्ह्यातील ८०५५ अर्ज पात्र दावे व हरकतींसाठी १८ डिसेंबरपर्यंत मुदत



जनसंचलन/बुलढाणा

अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी जाहिर करण्यात आली आहे. ही मतदार यादी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिल कार्यालयात प्रसिध्द करण्यात आली असून सर्व मतदारांनी या मतदार यादीत आपले नाव तपासून घ्यावे, असे आवाहन सहा. मतदार नोंदणी अधिकारी, अमरावती शिक्षक मतदार संघ विभाग अमरावती तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. शिक्षक मतदारसंघासाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्यासाठी १ जानेवारी २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याकरीता मा.भारत निवडणूक आयोगाने कार्यक्रम घोषित केला आहे. अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी १ जानेवारी २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत शिक्षक मतदारसंघाच्या मतदार याद्यामध्ये सर्व पात्र शिक्षक मतदारांना नव्याने नाव नोंदणीकरीता अंतिम दि. ६ नोंव्हेबर २०२५ पर्यंत होती. दिलेल्या कालावधीत नोंदणी साठी प्राप्त झालेल्या अर्जाची नोंदणी करून दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षक मतदार संघाची प्रारुप मतदार यादी जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तहसिल कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सर्व मतदारांनी मतदार यादीत आपले नाव तपासून घ्यावे. ही प्रारुप मतदार यादी जाहिर केल्यानंतर १८ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. प्राप्त झालेले दावे व हरकती दि. ५ जानेवारी २०२६ पर्यंत निकाली काढण्यात येईल तसेच अंतिम मतदार यादी दि. १२ जानेवारी २०२६ रोजी प्रकाशित होणार आहे. या पुनर्रिक्षण कार्यक्रमात बुलढाणा जिल्ह्यातून एकूण ८६४८ अर्ज प्राप्त झालेले असून त्यापैकी ८०५५ अर्ज पात्र ठरले आहेत. ५९३ अर्ज अपात्र घोषित करण्यात आले आहेत. शिक्षक मतदारसंघ प्रारुप मतदार यादीमध्ये काही आक्षेप असतील तर वेळेत दाखल करण्याचे आवाहन सहा. मतदार नोंदणी अधिकारी, अमरावती शिक्षक मतदार संघ विभाग अमरावती तथा जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार शिक्षक अटकेत

## सहआरोपी अल्पवयीन मुलीची पोलिसांकडून चौकशी...

जनसंचलन/मलकापूर

अल्पवयीन विद्यार्थिनीतर शिक्षकाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना शुक्रवार, ५ डिसेंबर रोजी उघडकीस आली. पीडितेच्या तक्रारीवरून, मलकापूर शहर पोलिसांनी संबंधित शिक्षकाविरुद्ध रात्री उशिरा पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. या प्रकरणातील सहआरोपी असलेल्या अल्पवयीन मुलीचीही चौकशी करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. मुकेश परमसिंग रबडे (४०, रा. तरोडा, ता. मोताळा) असे अटक केलेल्या आरोपी शिक्षकाचे नाव आहे. आरोपीने शिक्षकी पेशाचा व ओळखीचा गैरफायदा घेत अल्पवयीन पीडितेला जाळ्यात ओढले. २८ ऑक्टोबर रोजी पीडितेशी संपर्क करून तिला शहरातील तहसील चौकात बोलावले. त्यानंतर शैक्षणिक नोट्स व गुण वाढवून देण्याचे आमिष दाखवून दुचाकीवरून एका खोलीत नेले. तेथे पीडितेच्या मैत्रिणीला व्हिडिओ कॉल केला व स्क्रीन रेकॉर्डिंग सुरू ठेवण्यास सांगून पीडितेवर अत्याचार केला. पीडितेने विरोध केल्यावर तिला मारहाण करून गप्प केल्याचा आरोप



तक्रारीतून करण्यात आला आहे. दुसऱ्या आरोपीस १० डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी अत्याचार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीला १० डिसेंबरपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी ठोठावण्याचे आदेश बुलढाणा विशेष न्यायालयाने ६ डिसेंबर रोजी दिले आहेत. दिवसांची आरोपीला पोलिस कोठडी सुनावली आहे. दिवशी, दि. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी देत कुटुंबीयांना इजा पोहोचविण्याचा इशाराही दिला. भीतीपोटी पीडिता घरी परतली. त्यानंतर आरोपीने फोनद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र पीडितेने प्रतिसाद दिला नाही. पुढे पीडितेच्या अल्पवयीन मैत्रिणीने तिच्या ५ मोबाइलवरून संबंधित व्हिडिओ स्क्रीन रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल केल्यामुळे हा प्रकार पीडितेच्या कुटुंबीयांच्या लक्षात आला. त्यानंतर पीडितेने घरच्यांना घडलेला प्रकार सांगितला आणि मलकापूर शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आरोपी शिक्षकाला दि. ५ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली आहे. सहआरोपी अल्पवयीन मुलीची चौकशी सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक गणेश गिरी करीत आहेत.

# ट्रॅक्टरवरून पडून शेतकऱ्याचा मृत्यू चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

तालुक्यातील दिवठाणा येथील ज्ञानगंगा नदीवरील पुलावर शुक्रवारी रात्री झालेल्या अपघातात भालेगाव येथील देवीदास वामन सोनोने (६५) यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध हिवरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. निंबाजी रामदास सोनोने (५५, रा. भालेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, देवीदास सोनोने हे कापसाची नोंदणी करून खामगाव येथून गणेश महादेव वैतकार (४२, रा. काळेगाव) यांच्या मालकीच्या (एमएच. २८ ई-११४९) क्रमांकाच्या ट्रॅक्टरने घरी




परतत होते. रात्री सुमारे ९:३० वाजता येथील दिवठाणा पुलाजवळ चालक वैतकार यांनी ट्रॅक्टर भरधाव आणि निष्काळजीने चालविल्याने एक चाक रस्त्यावरील खड्ड्यात अडकले. ट्रॅक्टरमध्ये बसलेले देवीदास सोनोने खाली पडले व चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे

# लाकुडची अवैध वाहतूक करणारा ट्रक पकडल...

## ट्रक सह ४ लाख ७५ हजाराचा मुद्देमाल जप्त



जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात विनापरवाना झाडांची अवैध कत्तल तसेच वाहतूक सुरू आहे. मोठ्या प्रमाणात हे तोडलेले लाकूड मध्यप्रदेश येथील बुरहानपुरला नेले जातो.अशाच एक लाकुडची अवैध वाहतूक करणारा ट्रक मोताळा तालुक्यात वन कर्मचाऱ्यांनी पकडला असून याप्रकरणी वन गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत प्राप्त माहिती अशी की मोताळा वनपरिक्षेत्र अंतर्गत च्या धामणगाव परिसरातून लातूरची अवैध वाहतूक येतात असल्याची गुप्त माहिती मोताळा वाणी कर्मचाऱ्यांना मिळाली होती त्यानुसार दिनांक ५ डिसेंबरच्या सायंकाळी खांडवी ते ब्राह्मणदा रोडवर वनपाल पी.एम. नारखडे आणि वनरक्षक के.एन.तराळ पाळत ठेऊन विनापरवाना जळतन लाकडे वाहतूक करीत असताना ट्रक क्र.-४३ -३७९४ याला पकडले. सदर ट्रक व जळतन लाकडे जप्त करून मोताळा वनपरिक्षेत्र कार्यालय मोताळा येथे ठेवण्यात आले आहे. ट्रक मध्ये मोहा,निम,बेहडा प्रजातीचे जळतन होते.या कारवाईत एकूण ४ लाख ७५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलं असून वनगुन्हा दाखल करण्यात आलं आहे.

# बुलढाण्यात पोलीस वसाहतीत धाडसी चोरी; पोलिसांच्या अनुपस्थितीचा चोरांना साधला सटीक फायदा!

जनसंचलन/ बुलढाणा

शहरात पोलिसांच्या वर्दळीचा परिसर त्यातही पोलिस वसाहत! पण तरीही चोरांनी पाच घरांचा दरवाजा फोडत तब्बल वीस लाखांचा मुद्देमाल लंपास केला. ही अभूतपूर्व चोरी ६ डिसेंबर रोजी चिखली रोडवरील देवी मंदिराशेजारील पोलिस वसाहतीत घडली असून शहरात मोठी खळबळ उडाली आहे. निवडणूक कामानिमित्त अनेक पोलिसांची ड्युटी बाहेर लागली होती. त्याच संधीचा अचूक अंदाज घेत चोरट्यांनी वसाहतीत मुक्तसंचार करत एएसआय वारे, पोलिस कॉन्स्टेबल रुबीना पटेल यांच्यासह इतरांच्या घरांत हात साफ




केला. घरांमधून रोख रक्कम, सोन्याचांदीचे दागिने असा लाखोंचा ऐवज चोरट्यांनी आरामात उचलला.

धक्कादायक बाब म्हणजे पोलिस अधीक्षक कार्यालय आणि ग्रामीण पोलिस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या वसाहतीत ही चोरी झाली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांसह फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेत तातडीने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व संशयितांच्या हालचालींचा मागोवा घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८